वर्ष १५ वे

अंक १ ला

**माणसानं सोन्यासारखं होण्यापेक्षा परीसासारखं व्हावं!**
**जिथं जावं त्याचं सोनं करून यावं!**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

**(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)**

**Website : http://www.parnermitramandalpune.com/**

**यांचे मुखपत्र**

# संवाद

**नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये**

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- राहिलेल्या बांधकामाचा अपेक्षित खर्च रु.७० लक्ष
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०′ x १४′
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

**डिसेंबर २०१४**
**जाने.-फेब्रु.-मार्च २०१५**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

**आपण यापैकी काय करु शकतो?**

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ११,००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

- **तळमजला व दोन मजले बांधून पूर्ण झाले असून त्यामध्ये ८० विद्यार्थी राहात आहेत.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

दरवर्षी अतिशय उत्साहाने पार पडणारा आपल्या मंडळाचा स्नेहमेळावा व गुणगौरव सोहळा याही वर्षी दि.०३ ऑगस्ट, २०१४ रोजी संपन्न झाला. यावर्षी या सोहळ्यासाठी **अधिक्षक अभियंता श्री. चंद्रमोहन हंगेकर, पोलीस उपायुक्त डॉ.राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त डॉ.सुधाकर पठारे व तरूण उद्योजक श्री.प्रमोदजी गायकवाड प्रमुख पाहुणे** म्हणून उपस्थित होते. या पाहुण्यांकडून तरूण युवकांसाठी खूपच प्रेरणा मिळाली. आपल्या तालुक्याचा सर्वजण दुष्काळी तालुका म्हणून पारनेरचा उल्लेख करतात. परंतू पावसाचे पाणी आपल्याच भागात थोपविण्याचे नियोजन चांगल्या प्रकारे केले तर या परिस्थितीवर आपण सहज मात करू शकतो, हे सहज सुलभ पद्धतीने व आकडेवारीसह इंजि.चंद्रमोहन हंगेकर यांनी सिद्ध करून दाखविले व सर्व उपस्थित पारनेरकरांना आश्चर्यचकित केले. हे मला मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

**प्रशांत सुंबेचा** गौरव करताना पारनेरच्या खाणीतून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून भारतीय सेवेत आता विद्या विभूषीत रत्ने गेल्या दोन वर्षापासून समाविष्ट होत आहेत. त्याचा आम्हा सर्व पारनेरकरांना सार्थ अभिमान वाटतो.

मागील अंकामध्ये मंडळाचे **अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके** यांच्याविषयी देणग्या गोळा करण्याबद्दल मी उल्लेख केला होता. या लिखाणापर्यंत श्री.घोडके यांच्या पुढाकाराने **मंडळाने आतापर्यंत रू.५० लक्ष पेक्षा अधिक देणग्या गोळा केल्या असून** लवकरच आपल्या **वसतिगृहाच्या तिस-या व चौथ्या मजल्याचे काम हाती घेण्यात येत आहे**. बांधकामाबाबत मार्गदर्शन व काही सुचना असल्यास त्या निश्चितपणे आमच्यापर्यंत पोहोच कराव्यात ही विनंती.

**पारनेरकरांचे कर्तृत्व** हे सदर तसेच **वस्त्रबँक व बुकबँक या यशस्वीपणे कार्यान्वित** आहेत. आपल्या मुळ उद्देशाप्रमाणे ग्रामीण भागातील गरजू व हुशार विद्यार्थ्यांना आपल्या विद्यार्थी वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी आपण शिफारस करावी व गरजूंची अपेक्षापूर्ती करावी, असे मी आपणा सर्वांना आवाहन करतो.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूकांमध्ये आपल्या **पारनेर तालुक्याने आमदार म्हणून श्री.विजयराव औटी** यांची तिस-या वेळेस फेरनिवड केल्याबद्दल मंडळातर्फे मी त्यांचे **हार्दिक अभिनंदन** करतो.

अंकाच्या मुखपृष्ठावर आवाहन केल्यानुसार रू.१ लक्ष देणगी देणारांची आता सुरुवात झाली आहे. आपण समाजातील अशा दानशुरांपर्यंत जाऊन मंडळाच्या समाजकार्यासाठी मदत होण्यासाठी प्रयत्न करावेत ही अपेक्षा बाळगतो. त्याचबरोबर मंडळाचे अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके यांनी सुरु केलेल्या **वाढदिवसानिमित्त दरवर्षी किमान रू.१०००/- देणगी** देण्याच्या योजनेला खूप सभासदांनी सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. राहीलेल्या सभासदांनी / हितचिंतकांनी प्रेरणा घ्यावी व श्री.घोडके यांच्या प्रयत्नांना साथ द्यावी ही अपेक्षा ठेवतो व संपादकीयास अर्धविराम देतो.

जय जिजाऊ। जय शिवराय।।

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

**सभासद, हितचिंतक व देणगीदार यांना**

**नववर्ष २०१५ सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो !**

## वसतिगृह प्रवेश

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे चे सर्व सोयींनी युक्त असे वसतिगृह मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३ येथे सुरु झाले असून प्रवेशासाठी खालील पदाधिका-यांशी संपर्क साधावा.

**श्री.संजय जंगम - मो. ९४२३०२२१२३, ७०४०५७००६२**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम वृत्तांत

पारनेर तालुका मित्र मंडळाचा वार्षिक स्नेहमेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा दि.०३.०८.२०१४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मालधक्का चौक, पुणे येथे सायंकाळी ४.३० ते ८ या वेळात संपन्न झाली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मा.अध्यक्ष, प्रमुख पाहुणे आणि व्यासपिठावरील मान्यवरांच्या शुभहस्ते **छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन करण्यात आले.** आणि मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये **इंजि.विजयकुमार ठुबे** यांनी पारनेर तालुका मित्र मंडळाच्या सन १९७९ च्या स्थापनेपासून आजतागायतपर्यंतच्या वाटचालीचा चलतचित्रपटच उलगडून दाखविला. आपल्या खास शैलीतील वक्तव्यातून मित्र मंडळाचे कार्य कशा प्रकारे चाललेले आहे आणि आपल्याला वसतिगृहाच्या दोन मजल्यांचे काम करावयाचे आहे, त्याकरिता उपस्थितांना त्यांनी मदतीचे आवाहनही केले.

**''आपला पारनेर तालुका जरी दुष्काळी असला तरी तो ज्ञानाची खाण आहे.''** अशा सार्थ शब्दांत पारनेरवासीयांचा गौरव करून पुढील काळात विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा आपण मोठा उपयोग करून घेतला पाहिजे आणि शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे, कारण त्याशिवाय आपणाला तरणोपाय नाही असे त्यांनी ठामपणे सांगितले.

विविध क्षेत्रामध्ये महत्वपूर्ण कामगिरी बजाविलेल्या ग्रामस्थांचा मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांना गौरविण्यात आले. निवेदन व यादीवाचन मंडळाचे उपाध्यक्ष **श्री.मधुकर शिरोळे** यांनी केले.

प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये **पोलीस उपायुक्त डॉ.राजेंद्र माने** म्हणाले, **''आजच्या जगात सर्व क्षेत्रात मोठी स्पर्धा असल्याने कठोर परिश्रमास पर्याय नाही.''** एका राजाच्या दोन प्रश्नांची गोष्ट खुबीदारपणे सांगून त्यांनी श्रोत्यांमध्ये हास्याची कारंजी उडविली.

दुसरे प्रमुख पाहुणे **पोलीस उपायुक्त डॉ.सुधाकर पठारे** यांनी वाघ सिंहासारखा कामाचा झपाटा असलेले मंडळाचे अध्यक्ष हौसारामजी घोडके व वसतिगृह बांधकाम समितीचे अध्यक्ष इंजि.विजयकुमार ठुबे यांचा खास उल्लेख केला. विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनण्याचा एक वस्तुपाठच त्यांनी स्वतःच्या उदाहरणावरून उपस्थितांसमोर ठेवला. शेती किफायतशीर कशी होईल, तसेच शेतक-यांचे कर्जबाजारीपण दूर कसे करता येईल यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे उद्योगपती **श्री.प्रमोदजी गायकवाड** यांनी पारनेर तालुका मित्र मंडळाच्या कार्याचा यथोचित गौरव करून **''तुमच्याकडून प्रेरणा घेऊन मी माझ्या नाशिकसाठी निश्चितपणे काहीतरी सामाजिक कार्य करणार आहे''** अशा प्रकारचे सुतोवाच केले. आयुष्यामध्ये लाभलेल्या चांगल्या गुरूजनांची त्यांनी स्तुती केली. आपल्या यशस्वी उद्योजकतेचे रहस्य उलगडताना **''नोकरी नको, व्यवसाय करा व दुस-यांना कामे मिळवून द्या''** असा संदेश त्यांनी तरूणांना दिला.

**कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.चंद्रमोहन हंगेकर, अधिक्षक अभियंता** आपल्या भाषणात म्हणाले की, मी धुळ्याला असूनही अधूनमधून माझ्या हंगे या गावी जात असतो. गावची नाळ मी अजूनही तोडलेली नाही. **आपली माती आपली माणसे खरोखरच पवित्र आहेत. पारनेरचा**



स्नेहमेळाव्या प्रसंगी मार्गदर्शन करताना १) अधिक्षक अभियंता चंद्रमोहन हंगेकर, २) पोलीस उपायुक्त डॉ.राजेंद्र माने, ३) पोलीस उपायुक्त डॉ.सुधाकर पठारे, ४) श्री.बाळासाहेब मातेरे यांनी रू.१ लक्ष देणगी जाहीर केल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना अधिक्षक अभियंता चंद्रमोहन हंगेकर व पोलीस उपायुक्त डॉ.राजेंद्र माने,




स्नेहमेळाव्याप्रसंगी व्यासपीठावर डावीकडून डॉ.राजेंद्र माने, श्री.चंद्रमोहन हंगेकर, श्री.पोपटराव कुंडलीक, डॉ.सुधाकर पठारे, श्री.प्रमोद गायकवाड, श्री.बाजीराव जगदाळे, श्री.हौसाराम घोडके, डॉ.बाळासाहेब बांडे, श्री.भास्करराव शेळके, श्री.बाळासाहेब येणारे, अशोक वाबळे व इंजि.विजयकुमार ढुबे मंडळाच्या कार्याचा अहवाल सादर करताना.

**अन्यायाविरूद्ध लढण्याचा गुणधर्म, प्रामाणिकपणा, धाडस आणि बुद्धीमत्तेचे वरदान आपल्याला लाभलेले आहे.** त्याचा आपण पारनेर तालुक्यासाठी उपयोग करून घेतला पाहिजे. पारनेर तालुक्याचे क्षेत्रफळ सुमारे **१९३० चौ.कि.मी.** असून तेथे साधारणपणे **६९५ मि.मि.** वार्षिक पाऊस पडतो. या पाण्याचा योग्य विनीयोग केल्यास आपणास दुष्काळ जाणवणार नाही. पावसाच्या रूपाने साधारण **३० ते ३५ टीएमसी पाणी** पारनेर तालुक्यात पडते. **या पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा उपयोग करून पाणी अडवा व पाणी जिरवा असे धोरण राबवून आपणास दुष्काळावर मात करता येईल** असे अभ्यासपूर्ण विचार त्यांनी उपस्थितांसमोर ठेवले. सत्कर्मासाठी मदत करण्यासाठी एक साखळी निर्माण करावी असे सुचवत असतानाच त्यांनी मंडळास भरघोस देणगी देणार आहे असे आश्वासन दिले.

सत्कारार्थी ग्रामस्थांपैकी **श्री.प्रशांत आप्पासाहेब सुंबे** यांनी युपीएससी उत्तीर्ण होण्यामध्ये आपले आईवडील व गुरुजनांचा मोठा वाटा असल्याचे विनम्रतेने सांगितले. माझ्या आईला मी शब्द दिला होता की, "मी असे काही करून दाखवेन की लोक माझ्याकडे बघून तुझा मुलगा म्हणून बोट दाखवतील" व तो शब्द मी खरा करून दाखवला. **विद्यार्थ्यांनी प्रगतीच्या दृष्टीने अव्याहतपणे वाचन करून त्यांची आकलन शक्ती वाढवली पाहिजे** असे मार्गदर्शन त्यांनी केले.

यानंतर इ.१० वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचे यादीवाचन सहसेक्रेटरी **प्रा.गोरक्ष जगताप** यांनी केले व गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रके व दुर्मिळ ग्रंथ भेट म्हणून देण्यात आला. व्यासपीठावरील मान्यवर तसेच कार्यकारीणी सदस्य यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

१२वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचे वाचन **प्रा.माधवराव गायके** यांनी केले. व्यासपीठावरील मा.अध्यक्ष, प्रमुख पाहुणे व कार्यकारीणी सदस्य यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्रके व दुर्मिळ ग्रंथ भेट म्हणून देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी पारनेर तालुका मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकारीणी सदस्य, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सर्वांच्याच मनापासूनच्या सहभागामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला.

या प्रसंगी **प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक मा.बाळासाहेब महादेव मातेरे यांनी त्यांचे वडील कै.महादेव रामचंद्र मातेरे व मातोश्री कै.सौ.बबईबाई महादेव मातेरे यांच्या स्मरणार्थ वसतिगृहाच्या एका खोलीच्या बांधकामासाठी रू. १ लक्ष देणगी जाहीर केली. श्री.मातेरे यांनी यापूर्वी सुद्धा एका खोलीला आपल्या आईवडीलांच्या नावाने देणगी दिलेली आहे.** यानंतर मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन **श्री.भाऊसाहेब नरड सर** यांनी उत्तम प्रकारे केले. कार्यक्रम समाप्तीनंतर सर्वांनी मंडळातर्फे ठेवलेल्या अल्पोपहाराचा आस्वाद घेतला.

**शब्दांकन - भाऊसाहेब नरड**

**टिप :- सदर कार्यक्रमाचे सर्व फोटो पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.**




स्नेहमेळाव्या प्रसंगी उपस्थित मंडळाचे सभासद, ग्रामस्थ व विद्यार्थी.


# विद्यार्थी अभिनंदन - दहावी


कु.स्वरांजली राणासिंह नवले,रा.नवलेवाडी ९५%



आदित्य संजय बोरकर, रा.वडझिरे - ९२%


मितुल प्रशांत आढाव, रा.सांगवी सुर्या - ९२%



संकेत संजय यादव रा.यादवाडी - ९२%



किरण सुभाष लंके, रा.वडझिरे - ९०%


शिवम् जगन्नाथ शिंदे, रा.हंगे - ८९.५%


आदित्य प्रदीप खराडे, रा.निघोज - ८९%



कु.मुग्धा राजेंद्र घोडके, रा.कान्हुर पठार - ८९%



प्रणव विजय कर्डीले, रा.जखनगाव - ८८%



कु.श्रुती सुनील शेटे, रा.पारनेर - ८८%


दिग्विजय एकनाथ कळमकर, रा.कळमकरवाडी - ८६%


संकेत रंगनाथ भोंडवे, रा.ढवळपुरी - ८०%


कु.पुजा राजेंद्र मगर, रा.वाघुंडे - ७५%


कु.विशाखा गेणू काकडे, रा.गोरेगाव - ७५%


प्रतिक प्रकाश कोरडे, रा.हिवरे कोरडा - ७५%

## बारावी - कॉमर्स

मयुर रमेश साठे, रा.हंगे - ७५%

## बारावी - सायन्स

कु.श्वेता बाबासाहेब साठे, रा.हंगे - ८२%

कु.अनुजा ज्ञानदेव बोरूडे, रा.करंदी - ७७%

रोहन हरिभाऊ शेळके, रा.नारायणगव्हाण - ६०%

## स्कॉलरशिप


कु.अमरेंद्र धनंजय शेंडकर, रा.लोणी मावळा माध्यमिक शिष्यवृत्ती पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत १५वा आला.

## आपण असे केले तर



**डॉ. बाळासाहेब बांडे** रा.टाकळी ढोकेश्वर यांनी त्यांची सुकन्या **कु. श्वेता** हीची **बी.जे. मेडीकल कॉलेजमध्ये मेरीटवर निवड** झाल्याबद्दल मंडळास **रू.२५०००/-** देणगी दिली.


**Shri. B. P. Khodade & Co.**
(Engineers & Govt. Contractor)


Sangvi, Pune - 411027.

**Mobile : 9822563390**

**Building, Roads & Drainage**
**ON HIRE :-**
J.C.B., DUMPERS & COMPRESSORS

# अभिनंदन

✽ आमदार **श्री. विजयराव भास्करराव औटी** यांची महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या ऑक्टोबर २०१४ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीत **पारनेर** मतदार संघातर्फे तिसऱ्यांदा **आमदार** म्हणून निवड झाली. पारनेर तालुक्यात पहिल्यांदाच **आमदार श्री. विजयराव औटी** यांनी **विजयाची हॅट्रीक** केली आहे.






✽ **प्रा.माधव पंढरीनाथ गायके**, रा.वासुंदे हे रयत शिक्षण संस्थेच्या पिंपरी, पुणे येथील महात्मा फुले विद्यालयात ज्युनियर कॉलेज येथे कार्यरत असून त्यांची महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे येथे ''**अर्थशास्त्र**'' या विषयासाठी ''**अभ्यासमंडळ सदस्य**'' म्हणून निवड झाली आहे.

✽ **सी.ए. संजय यशवंतराव खोसे** रा. पाडळी दर्या यांची **डब्ल्यु.आय.आर. सी. व आय.सी.आय.ए.** या संस्थेच्या अंतर्गत लेखा परीक्षण समितीवर स्विकृत सदस्य म्हणून नेमणूक झाली.






✽ **श्री. कानिफनाथ नामदेव आहेर**, रा.नांदुर पठार यांची **अभ्युदय सहकारी बँक, मुंबई च्या २०१४ ते २०१९** या कालावधीसाठी **संचालकपदी** निवड झाली.

✽ **डॉ. हनुमंत पांडुरंग लोहार**, एमबी बीएस, डीएनबी, एमएनएएमएस (न्यू दिल्ली) यांची डी.वाय.पाटील मेडीकल कॉलेजमध्ये जनरल सर्जरी विभागात **सहाय्यक प्रोफेसर** या पदावर निवड झाली. त्यानिमित्त त्यांचे सासरे **श्री.देवराम काळुजी इघे**, रा.टाकळी ढोकेश्वर यांनी मंडळास **रू.२००१/-** देणगी दिली.





✽ **श्री. विपुल शिवाजीराव घेमुड**, पिंपरी जलसेन यांना **एम.एस्सी. फिजिक्स** मध्ये विशेष प्राविण्य मिळून **७५.६** टक्के गुण मिळाले.

पाण्याचा वापर जपून करा!


✽ **श्री. अक्षय ज्ञानेश्वर पोटघन**, रा.जातेगाव यांस बी.ई. मेकॅनिकलमध्ये **विशेष प्राविण्य** मिळाले.





✽ **श्री. भाग्येश अशोक पटवा**, रा. वडझिरे हे पहिल्याच प्रयत्नात **सनदी लेखापालची (सी.ए.)** अंतीम परीक्षा उत्तीर्ण झाले.

✽ **श्री. बाळू बबन फापाळे**, रा.गारगुंडी हे पहिल्याच प्रयत्नात **सनदी लेखापालची (सी.ए.)** अंतीम परीक्षा उत्तीर्ण झाले.





✽ **श्री. सखाराम कोंडीबा गागरे**, रा.वनकुटे यांची **श्री.साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था, सांगवी, पुणे** या संस्थेवर **अध्यक्षपदी बिनविरोध निवड** झाली.

# सेवानिवृत्ती



**श्री. अनंत सुखदेव जाधव**, रा.वेसदरे हे ३३ वर्षांच्या सेवेनंतर पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या छत्रपती शिवाजी विद्यानिकेतन क्र. ए-१ या शाळेतून मुख्याध्यापक म्हणून **दि.३१.०५.२०१४** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या **मार्गदर्शनाखाली** पुणे महानगरपालिकेच्या **अनेक विद्यार्थ्यांनी माध्यमिक शालांत शिष्यवृत्ती** मिळविली. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन पुणे महानगरपालिकेने गौरवचिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

# नांदा सौख्य भरे

✽ श्री. शिवाजीराव मेथाजी बोरकर रा.वडझिरे यांचे सुपुत्र **चि.अविकुमार** व श्री.हनुमंत धोंडीबा मोरे रा.वडझिरे यांची सुकन्या **सौ.सुनिता** यांचा शुभविवाह **दि.१९.०८.२०१४** रोजी संपन्न झाला.

✽ डॉ. संपत बाबुराव केदारे रा.वडनेर हवेली यांचे सुपुत्र **चि.सुजान** व डॉ.सुधीर अनंत साठे रा.दोंडाईचा जि.धुळे यांची सुकन्या **सौ.ईशा** यांचा मंगल परिणय सोहळा **दि.०२.११.२०१४** रोजी संपन्न झाला.

# आपण असे केले तर

❇ **श्रीमती वासंतीबाई किसनराव क्षीरसागर** यांच्या दि. १६.८.२०१४ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे भाचे **प्रा. जगदीश तुकाराम देंडगे**, रा. गांजीभोयरे व **श्री. नामदेव मारुती साबळे**, रा. रुई छत्रपती यांनी मंडळास प्रत्येकी **रु. १०००/-** देणगी दिली.



❇ **कै.भगवान काशिनाथ काळे** सर रा. गोरेगाव यांच्या दिनांक १९.१०.२०१४ च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र **श्री.अनिकेत** यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.



❇ **चि. सोहम** यांच्या दिनांक ४.९.२०१४ च्या वाढदिवसा निमीत्त पिताश्री **श्री.तुकाराम विठ्ठल नरसाळे**, रा. गोरेगाव यांनी मंडळास **रु. १०००/-** देणगी दिली.



❇ **कै. सौ. सुशिला मारुती पोटघन** रा.जातेगाव यांच्या दिनांक १७.०८.२०१४ च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र **श्री.अविनाश** यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.

❇ **कै. सदाशिव किसन शिंदे व कै. श्रीमती सिंधु सदाशिव शिंदे** रा. सारोळे अडवाई यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र **श्री. विकास व श्री.प्रविण** यांनी प्रत्येकी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.






❇ **कै. श्रीमती लक्ष्मीबाई आश्रुजी आग्रे** रा.पारनेर यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र **श्री. अशोक** यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.

❇ **कै. दत्तात्रय नाना खोसे** रा.पाडळी दर्या यांच्या दि.२०.०२.२०१५ च्या व **कै.भामाबाई दत्तात्रय खोसे** यांच्या दि.१९.०९.२०१४ च्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे सुपुत्र **श्री.गणेश** यांनी मंडळास **रु.११११/-** देणगी दिली.





❇ **कै. दत्तात्रय रामचंद्र बोरुडे** रा. करंदी यांच्या दिनांक ३०.१२.२०१४ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र **श्री.बाळासाहेब** यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❇ **चि.चैतन्य** यांच्या दि.१७.०८.२०१४ च्या वाढदिवसानिमित्त पिताश्री **श्री.भरत त्र्यंबक जगदाळे** रा.बाभुळवाडे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❇ **श्री. पराग अशोक दहिवळ, व सौ. श्रीलक्ष्मी पराग दहिवळ** रा. पिंपरी जलसेन यांनी त्यांची सुकन्या **कु.अयाना** हिच्या दि.१८.०७.२०१४ च्या जन्मदिनानिमित्त **मंडळास रू. २१११/-** देणगी दिली.



❇ **कै.प्रा. मुकुंद दत्तात्रय वाघमारे** रा. पारनेर यांच्या दिनांक **२३.१०.२०१४** च्या स्मृती दिनानिमित्त त्यांच्या पत्नी **श्रीमती मृदुला** यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



❇ **कै.कृष्णाबाई सुखदेव पोटे**, रा.बाभुळवाडे यांच्या **दि.२८.०७.२०१४** च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र **श्री.कुंडलीक सर** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.




❇ **कै.रामचंद्र बाबुराव काळे**, रा.पाडळी तर्फे कान्हुर यांच्या **दि.०२.११.२०१४** च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र **श्री.संतोष** यांनी मंडळास **रू.५००/-** देणगी दिली.




❇ **श्री.दिगंबर भगवंतराव वाबळे**, रा. घाणेगाव यांनी त्यांच्या **दि.२८.११.२०१४** च्या वाढदिवसा निमित्त मंडळास **रू.२१००/-** देणगी दिली.



❇ **श्री.अरूण शंकरराव देंडगे**, रा.गांजीभोयरे यांनी त्यांची नात **कु.स्वरा श्रीराम देंडगे** हिच्या **दि.२९.०९.२०१४** च्या वाढदिवसा- निमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❇ **श्री. भगवान सावळेराम पठारे** रा. राळेगण सिद्धी यांनी त्यांचे सुपुत्र **चि.प्रतिक** याच्या दि.१४.०८.२०१४ च्या वाढदिवसा निमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❇ **डॉ. सुधाकर रामचंद्र खराडे**, रा. निघोज यांनी त्यांच्या दि. ३०.१०.२०१४ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

## आपण असे केले तर



❊ **श्री. विजयकुमार गोविंदराव ढुबे,** रा.कान्हुरपठार यांनी त्यांच्या दिनांक ०१.११.२०१४ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. विजयकुमार गोविंदराव ढुबे,** रा. कान्हुरपठार यांनी त्यांचे सुपुत्र **चि. श्रेयस** याच्या दिनांक २९.११.२०१४ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.




❊ **श्री. किसन महादेव मातेरे** रा.बाभुळवाडे यांनी त्यांची नात **कु.त्विषा अमित मातेरे** हिच्या दिनांक १५.११.२०१४ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. राजेंद्र खंडू थोरात,** रा. पाडळी आळे यांनी त्यांचे पिताश्री **कै.खंडू गेणू थोरात** यांचे दि. ११.११.२०१४ चे स्मृतीदिना निमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

## निधन वार्ता

❊ **श्रीमती इंदुबाई शामराव देठे,** वय ८० वर्षे, रा.**श्रीरामपूर** यांचे **दि.२६.०९.२०१४** रोजी निधन झाले.



❊ **शंकरराव रामभाऊ देंडगे** वय ८६ वर्षे, रा. **गांजीभोयरे** यांचे **दि.०२.११.२०१४** रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र **श्री.अरूण** यांनी मंडळास **रू.११५१/-** देणगी दिली.




❊ **श्रीमती जोत्स्नादेवी भालचंद्र ढुबे** वय ८७ वर्षे, रा. **कान्हुरपठार** यांचे दिनांक **०६.११.२०१४** रोजी निधन झाले.

## निधन वार्ता



❊ **श्रीमती सुलोचना मनोहर फल्ले,** वय ६८ वर्षे, रा.**निघोज** यांचे **दि.२६.१२.२०१३** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपूत्र **विजय** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **तुकाराम केसू साबळे,** वय ८२ वर्षे, रा.रायतळे यांचे **दिनांक १५.०५.२०१४** रोजी निधन झाले.

❊ **बाबुराव माधवराव घोडके,** वय ९० वर्षे, रा.**कान्हुर पठार** यांचे **दि.१२.०६.२०१४** रोजी निधन झाले.



❊ **लक्ष्मणराव हरी साळुंके,** वय ८९ वर्षे, रा.**वासुंदे** यांचे **दि.१५.०७.२०१४** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपूत्र **श्री.उत्तमराव** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❊ **भाऊसाहेब नामदेव घावटे,** वय ८५ वर्षे, रा.**राळेगण थेरपाळ** यांचे **दि.११.०८.२०१४** रोजी निधन झाले.

❊ **ॲड. चंद्रभान चिमनाजी झावरे,** वय ८३ वर्षे, रा.**भोंद्रे** यांचे **दि.१६.०८.२०१४** रोजी निधन झाले.



❊ **श्रीमती नलीनी उर्फ नलु काकू नारायण केळकर,** वय ७५ वर्षे, रा.**जामगाव** यांचे **दि.२०.०८.२०१४** रोजी निधन झाले.



❊ **शिवाजीराव काशिनाथ खोडदे,** वय ७७ वर्षे, रा.**गांजीभोयरे** यांचे **दि.०४.०९.२०१४** रोजी निधन झाले.



❊ **रावसाहेब पंढरीनाथ रसाळ,** वय ६५ वर्षे, रा.**भोयरेगांगर्डा** यांचे **दि.०६.०९.२०१४** रोजी निधन झाले.


Nath ELEVATORS

# नाथ एलिव्हेटर्स

इमारतींच्या लिफ्टचे मॅन्युफॅक्चरर्स

- ❑ **Manufacturer of Elevators,**
- ❑ **Installation Commissioning &**
- ❑ **Maintenance of all type of Lifts.**

**Prop. : Y.D.Bhusare Patil**
**Cell : 9890909945**
**9552528284**

S.No.4/1+2, Narsiha Colony, Next to Balaji Law College, Thathwade, Pune - 411033.
Tel. : (O) 020-65104322 E-mail : nath.elevatorspune@gmail.com

## -: कर्तृत्व पारनेरकरांचे :-



जन्म ०१.०६.१९६८

# भगवान सावळेराम पठारे - *यशस्वी उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते*

**"आपण जेव्हा एखाद्या उद्योग व्यवसायात यश मिळवतो तेव्हा त्याचा अर्थ समाज आपल्या पाठीशी उभा राहिलेला असतो. समाजाचा पाठींबा नसेल तर आपण फारसे यश मिळवू शकत नाही. आपल्या यशात समाजाचा मोठा सहभाग असतो. समाजाचे हे ऋण समाजासाठी काही देऊन कमी करता येतं. त्याच भावनेतून मी जमेल ती व जमेल तशी मदत आजवर करत आलो आहे."** हे उद्‌गार आहेत आजचे प्रतीथयश उद्योगपती भगवानराव पठारे यांचे.

**मा.पद्मविभूषण अण्णासाहेब हजारे** यांच्यामुळे **आंतरराष्ट्रीय सेवाग्राम** म्हणून प्रसिद्धीस आलेले राळेगण सिद्धी हे भगवान पठारे यांचे गाव. मा.अण्णा हजारे यांनी भूदलातून निवृत्त झाल्यानंतर साधारण १९७५ च्या सुमारास गावपातळीवरील सुधारणा करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यापूर्वी दुष्काळ, गरीबी व अशिक्षीतपणामुळे या गावाची अधोगती झालेली होती. काय करावे हे सुचत नसल्यामुळे पोटाचे खळगे भरण्यासाठी गावातील लोक इच्छा नसतानासुद्धा अनेक अवैध उद्योग करीत असत. उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे मुलांना शिकविता येत नसे, तसेच दुष्काळामुळे मजुरीसुद्धा मिळत नसे. लोक दिशाहीन झालेले होते.

अण्णांनी ठरविले की गावची सुधारणा करायची व त्याप्रमाणे **सर्वसंग परित्याग करून केवळ गावकीलाच आपले आयुष्य त्यांनी अर्पण** करावयाचे ठरविले. सुरुवातीला त्यांना खूप त्रास झाला. पण हळूहळू लोकांना त्यांच्या समर्पण वृत्तीची जाणीव होऊन गावामध्ये बदल होऊ लागला. याच काळात जी किशोरवयातील मुले होते त्यांना हे सर्व दिसत होते. कळत-नकळत या सर्व चांगल्या गोष्टींचा संस्कार त्यांच्यावर होत गेला आणि ही मुले आपणही अण्णासारखे आयुष्यात काहीतरी करूया या जाणीवेने आपल्या आयुष्याचा विचार करू लागले. या विचाराचा संस्कार **भगवान पठारे** यांच्यावर झाला.

सहा भाऊ व तीन बहिणी आईवडील असे मोठे कुटुंब छोट्याश्या शेतीवर गुजराण करीत असत. सर्वात मोठा भाऊ मिलीटरीमध्ये भरती झाला आणि त्याने सर्व धाकट्या भावंडांची शिक्षणाची जबाबदारी स्वतःवर घेतली व घर सावरले. भगवानला पुण्यामध्ये शिक्षणासाठी पाठविले. तेथे राहून त्याने एम.कॉम. केले व एका खाजगी कारखान्यात हिशोब लेखनीकचे काम सुरू केले व त्यानंतर त्याने बी.एड्. केले.

शिकत असताना भगवान यांनी श्री.दिपक करंदीकर यांच्या 'प्रदीती प्रेस पार्टस्' मध्ये नोकरी सुरू केली. बी.एड्. झाल्यावर ही नोकरी सोडून शिक्षकाची नोकरी पत्करली. तेथे काही दिवस नोकरी केल्यानंतर श्री.दिपक करंदीकरांनी त्यांच्यातील हरहुन्नरीपणा, प्रामाणिकपणा पाहून त्यांना जास्त पगारावर परत आपल्या कारखान्यात नोकरीवर घेतले व येथून पुढे त्यांचे आयुष्यच बदलून गेले. काहीतरी व्यवसाय करायचा हे त्यांच्या डोक्यात होतेच. ते काम करीत असलेल्या कंपनीच्या एका ठेकेदाराने अचानक काम बंद केले. ते बंद केलेले काम श्री.करंदीकर यांनी पठारे यांना दिले आणि सोबत दोन वेल्डींगच्या मशीन दिल्या. **या संधीचे श्री.भगवान यांनी सोने केले.** एक भाड्याची जागा घेऊन वेल्डर भावाच्या मदतीने करंदीकरांचे काम करून दिले आणि मागे वळून पाहिलेच नाही. **उद्योगाची झालेली अशी सुरूवात ही त्यांच्यातल्या धडपड्या आणि ध्येयवादी व्यक्तीत्वाचे फळ होते.** एखादी संधी आली आणि तिचे रुपांतर सुवर्णात करायचे असेल तर भांडवलाची निश्चीतच गरज लागते. ती गरज सद्‌गुरू जंगली महाराज बँकेने पूर्ण केली.

वर्कशॉपच्या माध्यमातून त्यांनी एक छोटा टेम्पो घेऊन जवळजवळ २० वाहने बँकेच्या साहाय्याने घेतले आणि माल वाहतुकीचा नवा व्यवसाय सुरू केला. अशा रितीने वाटचाल करीत असता काहीतरी पुढे जाऊन एखादा मोठा उद्योग करावा असे त्यांच्या मनात आले. म्हणून त्यांनी तांत्रिक पार्श्वभूमी असलेल्या एका जोडीदार मित्राला घेऊन **कुबेर इंजिनियरींग प्रा.लि.** ही स्वतंत्र कंपनी स्थापन केली. १९९८ मध्ये सुरू केलेल्या या कंपनीने पहिल्यच वर्षी १ कोटी रूपयांची उलाढाल केली. आजमितीला या कंपनीची वार्षिक उलाढाल २७ कोटी रूपयांवर पोहोचली आहे व १५० लोकांना कायमस्वरूपाचा रोजगार उपलब्ध झाला आहे. अलपावधीत हे कसे साधले याबद्दल सांगतात, **"आम्ही ही कंपनी सुरू करतानाच काही धोरणात्मक गोष्टी स्विकारल्या होत्या. काहीही झाले तरी जी सेवा देऊ ती दर्जेदार असेल. त्या बाबतीत कुठेही तडजोड करावयाची नाही. बँकेशी केलेले व्यवहार काटेकोरपणे पाळून विश्वासार्ह्यता निर्माण करणे व जपणे या गोष्टी आम्ही आजही पाळतो. म्हणून आमची कंपनी मोठी झाली."**

उद्योजक म्हणून श्री.भगवान पठारे यांचे नाव परिसरात प्रसिद्ध झाले. पण एवढ्यावरच थांबतात ते भगवान कसले. त्यांनी यापुढचे पाऊल म्हणून १२ कोटी रुपयांचे भागभांडवल गोळा करून चिंभळी येथे **'जय भवानी माता स्टँपींग प्रा.लि.'** ही दुसरी कंपनी स्थापन केली आहे. एक वेगळा दृष्टीकोन घेऊन ते या कंपनीच्या माध्यमातून बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या धरतीवर आपली कंपनी चालवू इच्छितात. व्यवसाय वाढला पाहिजे असा पद्धतीने नियोजन व व्यवस्थापन करून आंतरराष्ट्रीय दर्जाची सेवा उपलब्ध करून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

आजवर त्यांनी ऑटोमोबाईल इंडस्ट्रीज्‌साठी काम केले. आता त्यापलीकडे जाऊन वेगळ्या सेवा देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. सतत नाविन्यपूर्ण गोष्टी करीत असाल तर कल्पनाशक्तीला मोठा वाव मिळतो ही बाब ओळखून पठारे नव्या नव्या गोष्टी करीत राहतात. मंदीच्या काळात सुद्धा नवीन इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करून तेजीच्या काळात ते वापरून

फायदा मिळवितात. त्यामुळे मंदी येऊन सुद्धा त्यांच्या व्यवसायावर कुठलाच परिणाम होत नाही.

एकच एक व्यवसाय तुम्ही करीत राहीला तर त्यात अनेक धोके संभवतात. **एकाच्या जोडीने आणखी काही व्यवसाय केले तर एकाचा तोटा भरून निघतो किंवा एकाचा नफा दुस-या व्यवसायाला उभारी देतो हे तत्व अंगीकारत पठारे एकाच वेळी अनेक व्यवसाय करताना दिसतात.** ३ मोठ्या कंपन्यांसह आज ते बांधकाम व्यवसायात आहे. जोडीला ३ कपड्यांची मोठी दुकाने ते चालवितात, किराणा मालाचे दुकान चालवितात, शिवाय एक मेडीकलही त्यांनी सुरू केले आहे. एवढ्यावरच समाधानी न होता गावी काही नवीन शेतजमीन विकत घेऊन त्यामध्ये नवीन नवीन प्रयोग करत राहतात. आज त्यांनी १० एकरामध्ये डाळींबाची बाग लावली आहे तर ५ एकरामध्ये चिकू लावला आहे, तसेच आब्यांची झाडे सुद्धा लावली आहेत.

**एकच व्यक्ती एकावेळी काय काय करू शकते हे पठारे यांनी आपल्या धडपडीतून दाखवून दिले आहे.** त्यांना हे कसे साध्य झाले असा प्रश्न अनेकांच्या मनात उपस्थित होऊ शकतो.

ते याबद्दल सांगतात, **'सुस्पष्ट नियोजन आणि व्यवस्थापन या गोष्टी सांभाळल्या तरी रिमोट कंट्रोलच्या माध्यमातून आपण अनेक गोष्टी साध्य करू शकतो.** माझी ३ मोठी कापड दुकाने असून त्या माध्यमातून रू. ४ कोटींची उलाढाल होत असते. त्यात अनेक मुले काम करीत असतात. कापड दुकानांचे सर्व व्यवस्थापन त्यांच्या सुविद्य पत्नी **सौ. कल्पनाताई** पाहात असतात. नुकतेच त्यांना महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास परिषद पुणे या संस्थेतर्फे **भारतरत्न जे.आर.डी. टाटा** यांना अभिप्रेत असलेली **२१व्या शतकातील महिला उद्योजकांना** देण्यात येणा-या **उद्योगसखी** पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे. विशेष म्हणजे घरात बसून त्या हा सारा व्याप सांभाळतात. प्रत्येक दुकानाचे संगणकीकरण करून प्रत्येक कपडा या यंत्रणेशी जोडला असल्याने किती माल विकला, किती माल शिल्लक आहे याचा हिशोब घरबसल्या रोज घेता येतो. एकही कपडा पावतीशिवाय बाहेर जात नाही. अशी यंत्रणा आपण जागोजागी निर्माण केली तर आपण अनेक व्यवसाय एकाच वेळी करू शकतो.'

**श्री. भगवान पठारे यांना फुले शाहू आंबेडकर लोकमान्य पुरस्कार पारनेर तालुका मित्र मंडळाचा उद्योजक पुरस्कार, अहमदनगर मित्र मंडळाचा उद्योजक पुरस्कार, भारतरत्न जे.आर.डी. उद्योगरत्न पुरस्कार अशा १०० हून अधीक सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक पुरस्कार त्यांना त्यांच्या कार्याची पावती म्हणून मिळालेले आहेत. त्यांच्या सामाजिक बांधीलकीचे प्रतिक म्हणजे त्यांनी पारनेर तालुका मित्र मंडळास आतापर्यंत रू.८५,०००/- देणगी दिली.**

असा मानसन्मान कोणालाही सहजासहजी मिळत नाही. त्यांच्या यशस्वी उद्योजकांबरोबर त्यांनी सामान्य परिस्थितीतून निर्माण केलेल्या प्रतिकूलतेवर मात करत उद्योगाची वाट यशस्वीरित्या प्रगतीपथावर नेली. हे सर्व उत्कृष्ट व्यवस्थापन व नियोजनातून त्यांनी घडविले.

हे करीत असताना त्यांनी कित्येक तरूणांना स्वतःच्या पायावर उभे केले. अनेकांचे संसार सावरले. गावाच्या विकासाला तन-मन-धन या स्वरूपात मदत करून हातभार लावला. आईवडीलांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी व ग्रामीण भागातील मुलांना इंग्रजी माध्यमातील उत्तम शिक्षण मिळावे म्हणून आईच्या नावाने **'कौसाई इंटरनॅशनल इंग्लिश मिडीयम स्कुल'** सुरू केले. निष्काम भावनेतून त्यांनी अनेक सामाजिक संस्थांची उभारणी केली. अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदतीचा हात दिला. पिंपरी चिंचवड पतसंस्थेच्या माध्यमातून अनेकांना आर्थिक मदत उपलब्ध करून दिली. हे सारे करताना **पद्मविभूषण अण्णा हजारे** यांच्या आदर्शातून त्यांनी सतत शुद्ध आचार, शुद्ध विचार, निष्कलंक जीवन आणि त्याग या मूल्यांचा अंगीकार करीत त्याचे तंतोतंत पालन करण्याचा प्रयत्न करतात.


**संत साहित्याचे अभ्यासक असलेले पठारे प्रवचनाच्या माध्यमातून प्रबोधनाचेही काम करतात**. मनाने थकलेल्या माणसांना सावरण्यासाठी मार्गदर्शनही करतात. उद्योगव्यवसायाच्या माध्यमातून आपल्या व्यक्तीमत्वाचा विशिष्ट टप्पा पार केल्यानंतर सामाजिक बांधीलकी म्हणून समाजाला काहीतरी देणे हे ते आपले कर्तव्य समजतात. **विविध संस्थांकडून मिळालेले पुरस्कार म्हणजे श्री.भगवान पठारे यांच्या रूपातला उद्योग जगताचा नवा आदर्श लोकांपुढे ठेवण्याचा या संस्थांचा प्रयत्न आहे.** प्रतिकूल परिस्थितीतून एक यशस्वी उद्योगपती, आदर्श सामाजिक कार्यकर्ता, समाजप्रबोधनकार असा हा पठारे यांचा प्रेरक प्रवास आहे. त्यांच्या जीद्दीला पारनेरकरांचा सलाम !

**शब्दांकन - श्री.हौसाराम घोडके**




**मातोश्री व्याख्यानमालेमध्ये व्यासपीठावर मा.पद्मविभूषण अण्णासाहेब हजारे यांचे शेजारी श्री.भगवान पठारे व मार्गदर्शन करताना सौ.अपर्णाताई रामतिर्थकर**

### -: कर्तृत्व पारनेरकरांचे :-



# गिताराम भागाजी म्हस्के - *एक धडपडे व्यक्तीमत्व*

"पारनेर कान्हुर रस्त्यावरील सोबलेवाडी हे १२०० वस्तीचे गाव. या गावातच गितराम यांचा जन्म १९७१ साली झाला. आई-वडील दोघेही शेतकरी, आणि अशिक्षित. गावात शाळा फक्त इ.४थी पर्यंत. गीताराम यांचे शिक्षण ४थी पर्यंत तिथेच झाले. साधारणतः शेतकरी कुटुंब चौथीनंतरच मुलांचे किंवा मुलींचे शिक्षणं थांबवितात. कारण त्यापुढची शाळा पारनेर येथे असल्यामुळे इतक्या लांब जाऊन मुलांच्याकडे लक्ष देणे, शेतीच्या कामामुळे आईवडीलांना शक्य होत नसे.

परंतु गितारामने ५वी पासून पारनेरला जावयास सुरुवात केली. तेथेच त्यांनी एस.एस.सी. ते पदवीपर्यंतचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. बी.ए. झाल्यानंतर शिरूर येथे एम.ए. केले व त्यानंतर बी.एड्. केले. इतके शिकल्यानंतर त्यांना कोठेतरी शिक्षकाची नोकरी लागली असती. परंतु जात्याच राजकारणाची आवड असल्यामुळे त्यांनी गावच्या राजकारणात लक्ष घालावयास सुरूवात केली व गावच्याच विविध कार्यकारी सोसायटीचे ते अध्यक्ष झाले. त्यांनी त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळात सोसायटीची भरभराट केली आणि सोसायटीसाठी अद्यावत अशी इमारत बांधली. त्या इमारतीची आजची किंमत साधारण ५० लाख रू. होईल. त्यानंतर गितराम पारनेर ग्रामपंचायतचे सदस्य झाले. एक कार्यकर्ता म्हणून आपल्या नावाचा ठसा उमटविण्याचा ते पंचक्रोशीत प्रयत्न करत होते. अथक परिश्रम आणि आवड यामुळे ते यामध्ये यशस्वी झाले असते.

पण नियतीच्या मनात काहीतरी वेगळेच होते. पूर्ण उत्साहाने राजकारण करीत असताना साधारण २००१ मध्ये त्यांना हृदयविकाराचा त्रास होऊ लागला. पारनेरलाच डॉ.सैय्यद यांच्या हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल करण्यात आले. तेथून पुणे येथे रूबी हॉल क्लिनीक येथे त्यांना नेण्यात आले. तेथे उपचार करण्यात आल्यानंतर बरे वाटले व ते परत पारनेरला गेले. काही दिवसांनी पुन्हा त्रास सुरू झाला व अहमदनगर येथे त्यांना परत एका हॉस्पीटलमध्ये ॲडमीट व्हावे लागले. तेथे आठ दिवस उपचार केल्यानंतर तेथील डॉक्टरांनी त्यांना baloon mitral valvulopasty करावयास सांगितले व जहांगीर हॉस्पीटलला ऑपरेशनची तारीख निश्चीत केली.

जरी ते सुशिक्षित होते तरी पण त्यांना काळजी वाटू लागली. म्हणून त्यांनी त्यांचे मित्र श्री.बाबा सोबले यांना त्यांची अडचण सांगितली. ते व बाबा सोबले पुण्याच्या के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये **डॉ.बाळासाहेब बांडे** यांना भेटावयास आले. डॉ.बांडे यांनी सर्व कागदपत्रे पाहिल्यानंतर त्यांना सेकंड ओपिनीयनसाठी डॉ.मिलींद गडकरी यांचेकडे पाठविले. त्यांनी काही तपासण्या केल्यानंतर वरील ऑपरेशन न करता ओपन हार्ट सर्जरी करण्याचा सल्ला दिला. आणि त्याप्रमाणे त्यांनी ओपन हार्ट सर्जरी रूबी हॉल क्लिनीकला करून घेतली. डॉ. बांडे जवळ असल्यामुळे त्यांना धीर आला व ऑपरेशन यशस्वीरित्या पार पडले.

यामुळे त्यांना पुर्नजन्मच मिळाला व त्यांचे मित्र प्राचार्य इंद्रभानजी डांगे यांनी त्यांना सुचना केली की, त्यांना जे सरप्लस आयुष्य मिळाले आहे त्याचे सोने करायचे असेल तर शिक्षणाशिवाय दुसरे साधन नाही. **'शिक्षणानेच समाजातील गरीब माणूस सिंहासारखी डरकाळी फोडतो'** व त्यांची जन्मभूमी व कर्मभूमी पारनेर असल्यामुळे त्यांनी पारनेर येथेच इंग्रजी माध्यमाची शाळा काढावी असे सुचविले. खरे म्हणजे गितराम जरी बी.एड. झालेले असले तरी सुद्धा त्यांना शैक्षणिक अनुभव असा काहीच नव्हता. तरीपण त्यांना मनाला पटले तर त्या गोष्टीचा ते अभ्यासपूर्ण पाठपुरावा करतात. प्राचार्य डांगे यांनी सुचविल्याप्रमाणे त्यांनी इंग्रजी माध्यमाची शाळा पारनेर राळेगण सिद्धी रस्त्यावर ५ एकर जागेत सुरू



अधिक्षक अभियंता श्री.चंद्रमोहन हंगेकर यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना श्री.गितराम म्हस्के, इंजि.विजयकुमार ढुबे, पो.उ.डॉ.राजेंद्र माने, श्री.हंगेकर व श्री.सखाराम गागरे

करण्याचे ठरविले.

जवळ पैसा नाही आणि काम तर करावयाचे आहे. पण इच्छा असेल तिथे मार्ग सापडतो त्याप्रमाणे अनेक मित्रांनी, नातेवाईकांनी, हितचिंतकांनी जमेल त्या प्रकारे त्यांना मदत केली व पारनेर पब्लिक स्कुल ही पारनेरसारख्या ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू झाली. **आज रोजी तेथे ज्युनीयर के.जी. ते १०वी पर्यंत जवळ जवळ १००० विद्यार्थी शिक्षण घेत आहे. प्रत्येक वर्षी १०वीचा निकाल १०० टक्के लागतो. तसेच प्रत्येक वर्षी इ.४ थी व इ.७ वीच्या स्कॉलरशिप परिक्षेमध्ये १२ ते २० विद्यार्थी गुणवत्ता यादीत येत आहेत. २००७ साली त्यांनी या संस्थे अंतर्गत अध्यापक विद्यालय (डी.टी.एड्.) कॉलेज व २०१३ साली शिक्षण शास्त्र महाविद्यालय (बी.एड्.) कॉलेज सुरू केले. संस्था व विद्यालयाने पारनेर तालुक्यातच नव्हे तर नगर जिल्ह्यात एक चांगल्या प्रकारचा नावलौकिक व ठसा उमटविलेला आहे.**

अजुनही आयुष्यात खूप काही करावयाचे आहे असे सांगून ते मुद्दाम नमूद करतात की, **डॉ. बाळासाहेब बांडे** यांच्यामुळे त्यांना पुर्नजन्म मिळाला. तसेच **प्राचार्य इंद्रभानजी डांगे** यांच्यामुळे त्यांना आयुष्याची दिशा मिळाली. या दोन्ही व्यक्तींचे ते कधीच ऋण विसरत नाहीत.

अशा या गुणी व्यक्तीचा पारनेर तालुका मित्र मंडळातर्फे दि.०३ ऑगस्ट २०१४ रोजी पुणे येथे त्यांच्या आतापर्यंतच्या **सामाजिक व शैक्षणिक कार्याची पावती** म्हणून जाहीर सत्कार करण्यात आला.

**शब्दांकन - हौसाराम घोडके**

**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी मदत**
**म्हणजेच आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी मदत !**
**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा,**
**आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !**

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री. सुनील तोटे (suniltote11@gmail.com) (Cell : 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून 'पारनेर भवन', मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान

________________________

________________________

________________________

________________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
कार्याध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ठुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५